॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

*** सुविचार ***

चांगल्या विचारांनीच आयुष्यात चांगली माणसं जोडली जातात.

अहिल्यानगर | रविवार, दि. २५ ऑक्टोबर २०२६ | वर्ष ७ वे | अंक १०८ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145

# काँग्रेसचे ज्येष्ठ नेते भानुदास कोतकर यांचे निधन

## राजकीय, सहकार व कृषी क्षेत्रातील ज्येष्ठ नेतृत्व हरपले । केडगावमध्ये अंत्यसंस्कार, राजकीय क्षेत्रासह जिल्ह्यात शोककळा



**अहिल्यानगर । वीरभूमी –**

**अहिल्यानगरच्या राजकीय, सहकार आणि कृषी क्षेत्रात अनेक वर्षे योगदान देणारे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती भानुदास एकनाथ कोतकर उर्फ भानाभाऊ (वय ७४) यांचे शनिवारी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास निधन झाले. हृदयविकाराचा त्रास जाणवू लागल्याने त्यांना अहिल्यानगर येथील आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाने जिल्ह्याच्या राजकीय, सहकार आणि कृषी क्षेत्रातून हळहळ व्यक्त होत असून, एका ज्येष्ठ नेतृत्वाची उणीव निर्माण झाली आहे.**

भानुदास कोतकर यांच्या निधनाचे वृत्त समजताच राजकीय, सामाजिक, सहकार आणि कृषी क्षेत्रातील मान्यवरांसह कार्यकर्त्यांनी दुःख व्यक्त केले. स्थानिक राजकारणात अनेक वर्षे सक्रिय राहिलेल्या कोतकर यांच्या निधनाने अहिल्यानगरच्या राजकीय वाटचालीतील एका महत्त्वपूर्ण पर्वाचा अंत झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. अहिल्यानगर महानगरपालिकेचे माजी महापौर संदीप कोतकर, उद्योजक सचिन कोतकर आणि अमोल कोतकर यांचे ते वडील होते. माजी जिल्हा परिषद सदस्या सुवर्णा सचिन जगताप या त्यांच्या कन्या होत, तर महानगरपालिकेच्या माजी उपमहापौर सुवर्णा कोतकर या त्यांच्या स्नुषा होत. माजी आमदार दिवंगत शिवाजीराव कर्डिले आणि माजी आमदार दिवंगत अरुणकाका जगताप यांच्याशी त्यांचे व्याहीसंबंध होते.

शनिवारी सायंकाळी केडगाव येथील एकनाथनगरमधील त्यांच्या निवासस्थानामागील मोकळ्या जागेत भानुदास कोतकर यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी आमदार आशुतोष काळे, आमदार मोनिका राजळे, आमदार संग्राम जगताप, आमदार अक्षय कर्डिले, आमदार विठ्ठलराव लंघे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनी विखे, माजी सभापती अनुराधा नागवडे आणि दादा कळमकर यांच्यासह राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

भानुदास कोतकर यांनी केडगावच्या स्थानिक राजकारणातून आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. ग्रामपंचायतीचे सरपंचपद भूषविल्यानंतर त्यांनी पंचायत समिती, कृषी उत्पन्न बाजार समिती, महानगरपालिका आणि काँग्रेस संघटनेत विविध महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या. स्थानिक स्वराज्य संस्थांपासून जिल्हास्तरीय राजकारणापर्यंत त्यांचा सक्रिय सहभाग राहिला.

नगर तालुका पंचायत समितीचे उपसभापती आणि सभापती, नगर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष, शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष, नगर जिल्हा सहकारी बँकेचे संचालक तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशा विविध पदांवर त्यांनी काम केले. महानगरपालिकेचे नगरसेवक आणि गटनेते म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली. नगर–नेवासा विधानसभा मतदारसंघातून त्यांनी २००१ मध्ये विधानसभा निवडणूकही लढवली होती.

राजकीय क्षेत्रात कार्यरत असतानाच त्यांनी उद्योग क्षेत्रातही आपले स्थान निर्माण केले. संदीप उद्योग समूहाचे संस्थापक म्हणून त्यांनी उद्योगविश्वात योगदान दिले. राजकारण, सहकार आणि उद्योग या क्षेत्रांतील त्यांच्या कार्यामुळे अहिल्यानगरच्या स्थानिक राजकीय वर्तुळात त्यांची स्वतंत्र ओळख निर्माण झाली होती.

### कृषी बाजार समितीच्या विकासात योगदान

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नूतनीकरणासह विविध विकासकामांमध्ये भानुदास कोतकर यांची भूमिका महत्त्वाची मानली जाते. शेतकऱ्यांना कृषिमालाची विक्री करण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी त्यांनी प्रयत्न केले. त्यांच्या पुढाकारातून नगर तालुक्यात नेप्ती उपबाजार समितीची निर्मिती झाल्याचे सांगितले जाते. तसेच चिचोंडी पाटील येथेही उपबाजार समितीसाठी जागा उपलब्ध करून ठेवण्यात आली होती.

कृषिमालाच्या खरेदी–विक्रीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा विकसित करण्याच्या दृष्टीने त्यांनी केलेले प्रयत्न सहकार क्षेत्रातील त्यांच्या कार्याचा महत्त्वाचा भाग मानले जातात. नगर आणि मुंबई कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये संचालकपदाची जबाबदारी सांभाळताना त्यांनी कृषी क्षेत्राशी संबंधित संस्थांच्या कामकाजात सहभाग घेतला.

भानुदास कोतकर यांच्या निधनाने अहिल्यानगरच्या राजकीय, सहकार आणि कृषी क्षेत्रातील प्रदीर्घ कारकिर्दीचा अंत झाला आहे. त्यांच्या कार्यकाळातील राजकीय घडामोडी, सहकार क्षेत्रातील सहभाग आणि स्थानिक संस्थांमधील योगदानाची आठवण काढत विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

### भानुदास कोतकर यांनी भूषविलेली प्रमुख पदे

- १९८७ ते १९९२ : सरपंच, ग्रामपंचायत केडगाव
- १९९० : अध्यक्ष, भैरवनाथ एज्युकेशन सोसायटी, केडगाव
- १९९१ : संस्थापक अध्यक्ष, भैरवनाथ नागरी पतसंस्था, केडगाव
- १९९५ ते १९९७ : उपसभापती, पंचायत समिती, अहिल्यानगर
- १९९७ ते १९९८ : सभापती, पंचायत समिती, अहिल्यानगर
- १९९९ ते २००४ : संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, अहिल्यानगर
- २००१ : नगर–नेवासा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली
- २००२ : संचालक, महाराष्ट्र गृहनिर्माण विकास मंडळ (म्हाडा)
- २००२ : अध्यक्ष, नगर तालुका काँग्रेस (आय)
- २००२ ते २००७ : प्रभारी अध्यक्ष, नगर शहर काँग्रेस
- २००३ ते २००८ : संचालक, नगर जिल्हा सहकारी बँक
- २००५ ते २०१० : नगरसेवक, अहिल्यानगर महानगरपालिका
- २००६ ते २०११ : अध्यक्ष, शहर जिल्हा काँग्रेस (आय)
- २००८ ते २०११ : सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, अहिल्यानगर
- २००८ ते २०१३ : नगरसेवक, अहिल्यानगर महानगरपालिका
- २००९ : संचालक, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती, वाशी
- २०१० : गटनेते, महानगरपालिका
- २०११ ते २०१६ : अध्यक्ष, जिल्हा शहर काँग्रेस कमिटी
- २०११ ते २०१६ : संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, अहिल्यानगर

इतर जबाबदाऱ्या : अध्यक्ष, भैरवनाथ देवस्थान ट्रस्ट, केडगाव; उपाध्यक्ष, जिल्हा सायकल असोसिएशन, महाराष्ट्र; अध्यक्ष, संजय गांधी निराधार योजना (१ जानेवारी २००१ पासून).

## SPOT NEWS

### शंभराव्या साहित्य संमेलनाची आळंदीत नांदी

**पुणे –** ६९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या आठवणींना उजाळा देणारे आणि १०० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाची नांदी ठरणारे ‘साहित्यनिष्ठांची मांदियाळी’ गुरुवार,दि. २९ ऑक्टोबर रोजी श्री क्षेत्र आळंदी देवाची येथील फ्रूटवाले धर्मशाळेत होईल. ग्रंथदिंडी व ग्रंथपूजनाचे आयोजन करण्यात आले आहे,अशी माहिती माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहाच्या महासचिव प्रा स्वाती चाटे व महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यवाह सुनील महाजन यांनी पत्रकार परिषदेत दिली.मसापचे जिल्हा प्रमुख राजन लाखे, गप्पाष्टककार डॉ.संजय उपाध्ये व समन्वयक डॉ.महेश थोरवे उपस्थित होते. विश्वशांती केंद्र (आळंदी),माईर्स एमआयटी,महाराष्ट्र साहित्य परिषद व मराठी भाषा विभाग,महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सोहळ्याचे उद्घाटन ज्येष्ठ संगीतकार भावगंधर्व पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या हस्ते होईल.

### ‘दिवाळी’ फराळ महागला

**मुंबई –** दिवाळी दोन आठवड्यांवर येऊन ठेपल्याने बाजारपेठेत फराळाच्या पदार्थांची तयारी सुरू झाली आहे. मात्र, यंदा महागाईमुळे फराळ तयार करण्यासाठी लागणा–या साहित्याच्या दरात वाढ झाली आहे. तेल, डाळी, साखर, मसाले, सुका मेवा आणि तुपाच्या दरवाढीचा परिणाम तयार फराळाच्या किमतींवर झाला असून, तयार दरात गतवर्षीच्या तुलनेत १० ते १५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामुळे दिवाळीचा गोडवा वाढवणा–या तयार लाडू, करंजी, शंकरपाळी, अनारसे, चकली यांसारख्या पदार्थांसाठी यंदा ग्राहकांना अधिक पैसे मोजावे लागणार आहेत.

## विदर्भासह मराठवाड्याला पाऊस झोडपणार

**मुंबई । वीरभूमी –**

बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे आणि लवकरच चक्रीवादळ हे पुढे सरकणार आहे. यामुळे दुष्काळाशी सामना करणा–या महाराष्ट्राला मोठा दिलासा मिळणार आहे. विदर्भ, मराठवाड्यासह खानदेश, पश्चिम महाराष्ट्र चिंब चिंब होणार आहे. चक्रीवादळ लवकरच तीव्र होण्याची शक्यता आहे. कमी दाबाचा पट्टा पुढे सरकल्यावर देशातील १३ राज्यांमधील हवामान बदलेल. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार ऑक्टोबरच्या २७ ते २९ ऑक्टोबर दरम्यान विदर्भासह मराठवाड्याला पाऊस झोडपणार आहे.

पूर्व–मध्य बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्यामुळे पश्चिम–वायव्य दिशेने सरकण्याची शक्यता आहे. पुढील दोन दिवसांत कमी दाबाचा पट्टा अधिक सक्रिय होईल. लवकरच चक्रीवादळ पुढे सरकेल. या चक्रीवादळाचे नाव अर्णव असे आहे. या संभाव्य हवामान बदलाने राज्यात कोसळधार पडेल. २७ आणि २९ ऑक्टोबरदरम्यान राज्यातील काही भागात पाऊस पडण्याची शक्यता आहे. विदर्भ, मराठवाड्यासह इतर भागात पावसाच्या सरी कोसळतील.

## एफडीएच्या अधिकारावर गदा आणण्याचा प्रयत्न

**पुणे । वीरभूमी –**

एफडीएने केंद्रीय आरोग्य मंत्रालय आणि भारतीय अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण (एफएसएसएआय) विरोधात थेट मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. कायद्याची अंमलबजावणी करण्यापासून रोखले जात असल्याचा आणि अधिकार हिरावून घेतले जात असल्याचा एफडीएने दावा केला आहे. एफएसएसएआयने घटनाबा पद्धतीने समांतर अंमलबजावणी यंत्रणा निर्माण केली असून, त्याद्वारे राज्य सरकारच्या अधिकारांवर अतिक्रमण केल्याचा एफडीएचा दावा आहे.

एफएसएसएआयच्या मुख्य कार्यकारी अधिका–यांनी ‘केंद्रीय अन्न सुरक्षा अधिकारी’ आणि ‘केंद्रीय परवाना प्राधिकरण’ यांसारखी पदे निर्माण करून आपल्या अधिकारांचा बेकायदेशीरपणे वापर केल्याचे याचिकेत म्हटले असून ही पदे अन्न सुरक्षा आणि मानके कायद्याच्या वैधानिक चौकटीत बसत नसल्याचा एफडीएचा दावा आहे.

अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६ चा उद्देश अन्न नियमनाचे विकेंद्रीकरण करणे हा होता, असा दावाही एफडीएकडून याचिकेत करण्यात आला आहे. यापूर्वी या कायद्याची अंमलबजावणी राज्याचे अन्न सुरक्षा आयुक्त आणि नियुक्त अधिकारी यांच्यामार्फत केली जात होती, असेही एफडीएने म्हटले आहे. मात्र, त्यानंतर केंद्र सरकार आणि एफएसएसएआय यांनी कायद्यात विविध सुधारणा केल्या. या सुधारणांमुळे विकेंद्रित अंमलबजावणी व्यवस्था हळूहळू मोडीत काढली जात असल्याचा दावा याचिकेत करण्यात आला.

घटनाबा सुधारणा आणि नियम रद्द करण्याची तसेच, केंद्रीय परवाना असलेल्या आस्थापनांची तपासणी करण्यापासून राज्याच्या अधिका–यांना रोखणा–या मे २०२३ मधील आदेशाला स्थगिती देण्याची मागणी याचिकेत करण्यात आली आहे. २६ नोव्हेंबरला मुख्य न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडणार आहे.

# शिर्डी विमानतळावरून आता १२ उड्डाणे!

## रविवारपासून चार नव्या विमानफेऱ्यांची भर । हैदराबादशी हवाई संपर्क होणार अधिक मजबूत, पर्यटन व व्यवसायालाही मिळणार चालना

**कोपरगाव । वीरभूमी –**

तालुक्यातील काकडी येथील शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी आनंदाची बातमी आहे. रविवारपासून (दि. २५ ऑक्टोबर) शिर्डी विमानतळाच्या विमानसेवेत आणखी चार नव्या उड्डाणांची भर पडणार आहे. या विस्तारामुळे विमानतळावरून ये–जा करणाऱ्या विमानफेऱ्यांची संख्या आठवरून थेट बारावर पोहोचणार आहे. विशेषतः हैदराबाद मार्गावर प्रत्येकी दोन आगमन आणि दोन प्रस्थानाच्या विमानफेऱ्या सुरू होणार असल्याने शिर्डी आणि हैदराबाद यांच्यातील हवाई संपर्क अधिक मजबूत होणार आहे.

इंडिगो एअरलाइन्सच्या माध्यमातून ही नवीन विमानसेवा सुरू करण्यात येत आहे. नव्या वेळापत्रकानुसार, हैदराबादहून शिर्डीकडे येणारे पहिले विमान सकाळी ८.१० वाजता, तर दुसरे विमान दुपारी ४ वाजता शिर्डी विमानतळावर दाखल होईल. त्याचप्रमाणे, शिर्डीहून हैदराबादकडे जाणारे पहिले विमान सकाळी ८.३० वाजता, तर दुसरे विमान सायंकाळी ४.२० वाजता उड्डाण करेल.



नव्या विमानफेऱ्यांबरोबरच शिर्डी विमानतळावरून देशातील इतर प्रमुख शहरांसाठी सुरू असलेली विमानसेवाही कायम राहणार आहे. त्यानुसार, चेन्नईहून येणारे विमान सकाळी ११.०५ वाजता शिर्डीत दाखल होईल, तर शिर्डीहून चेन्नईकडे जाणारे विमान सकाळी ११.४० वाजता प्रस्थान करेल. बंगळुरूहून येणारे विमान दुपारी १२.३० वाजता शिर्डीत पोहोचेल, तर शिर्डीहून बंगळुरूकडे जाणारे विमान दुपारी १ वाजता उड्डाण करेल. दिल्लीहून येणारे विमान रात्री ८.१० वाजता शिर्डीत दाखल होईल, तर शिर्डीहून दिल्लीकडे जाणारे विमान रात्री ८.४५ वाजता रवाना होईल.

शिर्डी हे जगभरातील भाविकांचे श्रद्धास्थान आणि प्रमुख धार्मिक पर्यटनस्थळ आहे. साईबाबांच्या दर्शनासाठी देशाच्या विविध भागांतून दरवर्षी लाखो भाविक शिर्डीत येत असतात. अशा परिस्थितीत विमानफेऱ्यांमध्ये झालेली वाढ भाविकांसाठी दिलासादायक ठरणार आहे. प्रवासाचा वेळ वाचण्याबरोबरच शिर्डीला येणे–जाणे अधिक सोयीचे होण्यास मदत होणार आहे.

विमानसेवेच्या विस्तारामुळे शिर्डीतील हॉटेल व्यवसाय, टॅक्सीचालक, पर्यटन क्षेत्र तसेच स्थानिक व्यावसायिकांनाही आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. याशिवाय कोपरगाव, राहाता आणि परिसरातील नागरिकांनाही या वाढीव विमानसेवेचा फायदा मिळणार आहे. शिर्डीचा देशातील प्रमुख शहरांशी हवाई संपर्क अधिक व्यापक झाल्याने धार्मिक पर्यटनासोबतच व्यावसायिक हालचालींनाही चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

भविष्यात शिर्डी विमानतळावरून इतर प्रमुख शहरांसाठीही अधिक विमानसेवा सुरू होण्याचा मार्ग या विस्तारामुळे मोकळा होईल, अशी आशा प्रवाशांकडून व्यक्त केली जात आहे.

# SPOT NEWS

## वीरगावच्या शंतनु खुळे यांची रिझर्व्ह बँकेत ग्रेड-बी अधिकारीपदी निवड!

**● अकोले । वीरभूमी–**



अकोले तालुक्यातील वीरगाव येथील शंतनु ज्ञानेश्वर खुळे यांची भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ग्रेड–बी अधिकारी (व्यवस्थापक) पदावर निवड झाली आहे. देशपातळीवर घेण्यात आलेल्या या परीक्षेत यश मिळवत त्यांनी वीरगावसह अहिल्यानगर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे ग्रेड–बी अधिकारी पदासाठी देशपातळीवर निवड प्रक्रिया राबविण्यात आली. प्रवेश परीक्षा, मुख्य परीक्षा आणि मुलाखत अशा विविध टप्प्यांनंतर ही निवड करण्यात आली. नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात शंतनु खुळे यांनी यश संपादन केले. शंतनु यांचे प्राथमिक शिक्षण वीरगाव येथील प्राथमिक शाळेत, तर माध्यमिक शिक्षण स्वामी विवेकानंद विद्यालय, वीरगाव येथे झाले. त्यानंतर त्यांनी अकोले महाविद्यालय आणि संगमनेर महाविद्यालयात शिक्षण घेतले. बी.एस्सी. (फिजिक्स) ही पदवी प्राप्त केल्यानंतर त्यांनी सिम्बायोसिसमधून फायनान्स विषयात एमबीए पूर्ण केले. यापूर्वी त्यांनी महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या बीड येथील शाखेत परिविक्षाधीन अधिकारी म्हणून काम केले. सध्या ते मुंबई येथील नाबार्डच्या मुख्य कार्यालयात विकास सहाय्यक पदावर कार्यरत आहेत. या अनुभवाच्या बळावर त्यांनी भारतीय रिझर्व्ह बँकेतील प्रतिष्ठेच्या पदासाठी यश मिळवले आहे. शंतनु खुळे यांच्या या यशाबद्दल वीरगाव ग्रामस्थांसह अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध वित्तीय संस्थांमध्ये कार्यरत पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले असून, त्यांच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## अहिल्यानगरची सुमय्या शेख ठरली वर्षातील सर्वोत्तम खेळाडू

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

येथील प्रतिभावान महिला फुटबॉलपटू सुमय्या शेख हिने आपल्या दमदार कामगिरीच्या जोरावर वेस्टर्न इंडिया फुटबॉल संघटनेच्या वतीने दिला जाणारा २०२५–२६ हंगामातील वरिष्ठ महिला गटाचा 'वर्षातील सर्वोत्तम खेळाडू' पुरस्कार पटकावला आहे. मुंबई येथे झालेल्या पुरस्कार सोहळ्यात तिच्या या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करण्यात आला. सुमय्याने संपूर्ण हंगामात राज्यस्तरीय, राष्ट्रीय तसेच आंतरविद्यापीठीय स्पर्धांमध्ये सातत्यपूर्ण आणि प्रभावी कामगिरी केली. तिच्या खेळातील कौशल्य, गोल करण्याची क्षमता आणि संघाच्या यशात दिलेले योगदान यांची दखल घेत तिला या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २०२५–२६ च्या हंगामात सुमय्याने लोणावळा येथे झालेल्या महाराष्ट्र वरिष्ठ क्लब राज्य लीग स्पर्धेत विजेतेपद मिळविणाऱ्या क्रीडा प्रबोधिनी संघाचे प्रतिनिधित्व केले. केरळ येथे झालेल्या इंडियन वुमेन्स लीग (खथड) २ स्पर्धेत तसेच बंगळुरू येथे झालेल्या खथड २ अंतिम फेरीतही तिने सहभाग नोंदविला. जळगाव येथे झालेल्या आंतरजिल्हा स्पर्धेत अहिल्यानगर संघाने तृतीय स्थान मिळविले, तर सुमय्याने या स्पर्धेत सर्वाधिक गोल करून स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरण्याचा मान मिळविला. आंतरविद्यापीठीय फुटबॉल स्पर्धांमध्येही तिने आपल्या कामगिरीची छाप पाडली. मध्य प्रदेश येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत विजेतेपद मिळविणाऱ्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघात तिचा महत्त्वपूर्ण सहभाग होता.

# युवकांच्या सतर्कतेने शेडगावात बिबट्या जेरबंद

### माजी सरपंच विजय शेंडे, पोलीस पाटील कारभारी बेलेकर यांच्यासह वनविभागाच्या पथकाची तत्पर कार्यवाही





**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

श्रीगोंदा तालुक्यातील शेडगाव येथील कासारमळा परिसरात बिबट्याचा वावर असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, सर्पमित्र नितीन घायतडक यांच्या पुढाकाराने, माजी सरपंच विजय शेंडे, पोलीस पाटील कारभारी बेलेकर, पंचरत्न मंडळाचे युवक आणि वनविभागाच्या तत्पर कार्यवाहीमुळे बिबट्याला पिंजऱ्यात जेरबंद करण्यात यश आले.

वनपरिक्षेत्रपाल दिपाली भगत यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल हौसराव गारुडकर, वनरक्षक राजेंद्र जाधव यांच्यासह वनकर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत बिबट्याला सुरक्षित ताब्यात घेतले. बिबट्या जेरबंद झाल्याने ग्रामस्थांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

कासारमळा परिसरात बिबट्या दिसत असल्याची माहिती मिळताच सर्पमित्र नितीन घायतडक यांनी माजी सरपंच विजय शेंडे आणि पोलीस पाटील कारभारी बेल्हेकर यांना कळविले. विजय शेंडे यांनी तत्काळ वनविभागाला माहिती दिली. वनपरिक्षेत्र अधिकारी दिपाली भगत यांच्या मार्गदर्शनाखाली वनविभागाच्या पथकाने परिसराची पाहणी करून बिबट्याला पकडण्याची मोहीम हाती घेतली.

बिबट्याला पकडण्यासाठी पिंजऱ्याची आवश्यकता असल्याने नितीन घायतडक यांनी पुढाकार घेतला. २१ ऑक्टोबर रोजी स्वतःच्या खर्चाने वाहन भाड्याने करून श्रीगोंदा वनविभागाच्या कार्यालयातून पिंजरा आणला. यासाठी पंचरत्न मंडळाच्या युवकांनीही सहकार्य केले. पिंजऱ्यात आमिष म्हणून शेळी किंवा बोकड ठेवण्याची आवश्यकता होती. मात्र, ते उपलब्ध न झाल्याने युवकांसमोर अडचण निर्माण झाली. त्यावर पर्याय म्हणून युवकांनी तीन कोंबड्या विकत घेऊन पिंजऱ्यात ठेवल्या. त्यानंतर बिबट्या पिंजऱ्यात अडकला.

बिबट्या पिंजऱ्यात अडकल्याची माहिती मिळताच माजी सरपंच विजय शेंडे यांनी वनविभागाला कळविले. वनपरिक्षेत्र अधिकारी दिपाली भगत, वनपाल हौसराव गारुडकर, वनरक्षक राजेंद्र जाधव यांच्यासह वनकर्मचारी रामा पळसकर, केरू बोरुडे, अशोक आरडे, दिलीप केदारे, भाऊसाहेब जमदाडे आणि प्रसाद साळवे यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. वनविभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिस्थितीचा आढावा घेत बिबट्याला सुरक्षितपणे ताब्यात घेतले. बिबट्याला हलविण्यासाठी माजी सरपंच विजय शेंडे यांनी वाहनाची व्यवस्था करून सहकार्य केले. वनविभागाच्या पथकाने योग्य खबरदारी घेत बिबट्याला सुरक्षितपणे हलविले.

## इन्फोसिस कंपनीत निवडीबद्दल गणेश डावरे यांचा मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या वतीने सत्कार!



**● निघोज । वीरभूमी –**

निघोज येथील किराणा व्यावसायिक दिगंबर डावरे व मंगलताई डावरे यांचे चिरंजीव गणेश डावरे यांची म्हैसूर येथील नामांकित इन्फोसिस कंपनीत निवड झाल्याबद्दल मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. ट्रस्टचे विश्वस्त संतोषशेठ रसाळ व शंकरराव लामखडे यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला. आपल्या निवडीच्या आनंदाप्रीत्यर्थ गणेश डावरे यांनी ट्रस्ट संचलित प्रसादालयात अन्नदानासाठी देणगी दिली.

डावरे कुटुंब सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रातही सक्रिय आहे. अल्पसंख्याक समाजातील युवकाने आपल्या मेहनतीच्या जोरावर मिळवलेले हे यश समाजासाठी अभिमानास्पद असल्याचे मत विश्वस्तांनी व्यक्त केले.

गणेश डावरे यांच्या या यशाबद्दल परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

## शहरातील कापड व्यापारी संघाचा स्नेहमेळावा उत्साहात

### संजय चोपडा यांचा चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल सत्कार

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

परस्परांतील स्नेह, एकोपा आणि व्यापारी बांधिलकी अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने अहमदनगर ठोक कापड व्यापारी संघ, अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला कोजागिरी पौर्णिमा स्नेहमेळावा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. आनंदधाम रोड येथील हॉटेल परंपरा येथे झालेल्या या कार्यक्रमात संघाचे सभासद मोठ्या संख्येने सहभागी झाले. मनोरंजनात्मक खेळ, विविध स्पर्धा आणि गुणगौरव अशा उपक्रमांनी या स्नेहमेळाव्याला विशेष रंगत आली.

या स्नेहमेळाव्याच्या निमित्ताने व्यापारी बांधवांना एकत्र येत परस्परांशी संवाद साधण्याची, विचारांची देवाणघेवाण करण्याची आणि आपुलकीचे संबंध अधिक दृढ करण्याची संधी मिळाली. कोजागिरी पौर्णिमेचा आनंद लुटत उपस्थितांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. संघटनेतील एकात्मता आणि सामूहिक सहभागाचे दर्शन या कार्यक्रमातून घडले.

अहमदनगर मर्चंट्स को–ऑपरेटिव्ह बँकेच्या चेअरमनपदी ठोक कापड व्यापारी संघाचे सदस्य संजय चोपडा यांची निवड झाल्याबद्दल संघाच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. या निवडीबद्दल उपस्थित पदाधिकारी आणि सभासदांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी अहिल्यानगर ठोक कापड व्यापारी संघाचे उपाध्यक्ष सचिन चोपडा यांनी मनोगत व्यक्त करताना व्यापारी समाजात परस्पर विश्वास, स्नेह आणि एकोपा जपण्याची गरज अधोरेखित केली. ते म्हणाले की, अशा स्नेहमेळाव्यांमुळे सभासदांमधील आपुलकी वाढते, विचारांची देवाणघेवाण होते आणि संघटना अधिक मजबूत बनते. व्यापाऱ्यांचे हित जपतानाच सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी संघटना नेहमीच कटिबद्ध राहील. भविष्यातही सर्व सभासदांच्या सहकार्याने विधायक आणि सामाजिक उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले.

उपस्थित मान्यवरांनीही व्यापारी समाजात एकात्मता, परस्पर सहकार्य आणि सामाजिक सलोखा टिकवून ठेवण्याचे महत्त्व स्पष्ट केले. व्यापारी संघटना केवळ व्यावसायिक हितापुरती मर्यादित न राहता सभासदांमधील मैत्रीपूर्ण संबंध आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचे कार्यही करते. अशा उपक्रमांमुळे संघटनेतील परस्पर विश्वास वाढून संघटना अधिक सक्षम होते, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

कोजागिरी पौर्णिमेनिमित्त आयोजित या स्नेहमेळाव्यात विविध मनोरंजनात्मक उपक्रम, खेळ आणि स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. सभासदांनी या उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विजेत्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

# नामवंत पैलवानांच्या चित्तथरारक लढतींनी पाथर्डीत कुस्तीचा आखाडा गाजला!

### बाबा लाडींची सनी पैलवानावर मात । हिंदकेसरी महेंद्र गायकवाड व उपमहाराष्ट्र केसरी माऊली कोकाटे यांची अंतिम कुस्ती बरोबरीत

**● पाथर्डी । वीरभूमी–**

पाथर्डी शहरातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आयोजित कुस्ती मैदानात देशभरातून आलेल्या नामवंत मल्लांनी आपल्या ताकदीचे, चपळाईचे आणि डावपेचांचे दर्शन घडवत कुस्तीशौकिनांची मने जिंकली. हिंदकेसरी पैलवान महेंद्र गायकवाड आणि उपमहाराष्ट्र केसरी पैलवान माऊली कोकाटे यांच्यातील प्रतिष्ठेची अंतिम कुस्ती बरोबरीत सुटली. त्यामुळे या लढतीसाठी ठेवण्यात आलेले पाच लाख ५१ हजार रुपयांचे बक्षीस दोन्ही मल्लांना विभागून देण्यात आले. अयोध्येचे सुप्रसिद्ध पैलवान बाबा लाडी आणि पंजाबचे पैलवान सनी यांच्यातील चित्तथरारक लढतीनेही मैदानात रंगत आणली.

वीर वडार संघटनेच्या वतीने तसेच माजी नगरसेवक तुकाराम पवार, भोरुशेठ म्हस्के, मच्छिंद्र पवार, लहु पवार, संजय माने, सुभाष पवार आणि त्यांच्या मित्रपरिवाराच्या पुढाकारातून या कुस्ती मैदानाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागांतून आलेल्या नामवंत मल्लांनी आखाड्यात सहभाग नोंदविल्याने कुस्तीप्रेमींनी मोठी गर्दी केली होती. प्रत्येक लढतीतील डावपेच, चपळाई आणि ताकदीची चुणूक पाहण्यासाठी उपस्थितांची उत्सुकता शिगेला पोहोचली होती.

मैदानातील सर्वाधिक लक्षवेधी लढत हिंदकेसरी पैलवान महेंद्र गायकवाड आणि उपमहाराष्ट्र केसरी पैलवान माऊली कोकाटे यांच्यात झाली. दोन्ही नामवंत मल्लांनी एकमेकांना कडवी टक्कर देत विविध डावपेचांचा वापर केला. मात्र, अखेरपर्यंत कोणालाही निर्णायक विजय मिळवता आला नाही. त्यामुळे ही अंतिम कुस्ती बरोबरीत सोडविण्यात आली. या लढतीसाठी ठेवण्यात आलेले पाच लाख ५१ हजार रुपयांचे बक्षीस दोन्ही मल्लांना विभागून देण्यात आले.

अयोध्येचे सुप्रसिद्ध सेलिब्रिटी पैलवान बाबा लाडी आणि पंजाबचे पैलवान सनी यांच्यातील कुस्तीने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. सुरुवातीला सनी पैलवानाने बाबा लाडी यांच्यावर वर्चस्व मिळविण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यानंतर बाबा लाडी यांनी आपल्या चपळाईने आणि कौशल्यपूर्ण डावपेचांनी लढतीत जोरदार पुनरागमन केले. त्यांनी सनी पैलवानाला तीन वेळा मैदानात चीतपट केल्याने उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात या लढतीला दाद दिली.

लढतीदरम्यान 'कौशल्यानंदन राम है, भारत के नायक राम है' या भक्तिगीताची धून सुरू असताना आखाड्यातील वातावरण अधिकच उत्साहपूर्ण झाले. बाबा लाडी यांच्या कुस्तीतील चपळाईने उपस्थितांना पैलवान देवा थापा यांच्या कुस्तीची आठवण करून दिली.

इचलकरंजीचे महाराष्ट्र चॅम्पियन पैलवान श्रीमंत भोसले आणि बेनापूरचे पैलवान श्रीनिवास पातोड यांच्यातील कुस्ती सुमारे तासभर रंगली. दोन्ही मल्लांनी एकमेकांच्या डावपेचांना प्रत्युत्तर देत मैदानात चांगलीच चुरस निर्माण केली. दीर्घकाळ चाललेल्या या लढतीमुळे कुस्तीशौकिनांची उत्कंठा वाढत गेली. महाराष्ट्र चॅम्पियन पैलवान सत्पाल सोनटक्के आणि कालीचरण यांच्यातही अटीतटीची कुस्ती झाली.

पैलवान तुकाराम पवार यांचा पठ्ठा पैलवान कृष्णा पवार आणि सौरभ जाधव यांच्यातही कुस्ती झाली. याशिवाय पृथ्वीराज वनवे, नाथा पवार, संदीप गीते, धनराज पवार, राहुल पोकळे, कुणाल पवार, बबलू नेहराळे, बाळू गोल्हार, सचिन शिर्के, प्रमोद जाधव, कुमार माने, गणेश वाघमोडे, आयुष पवार आणि संघर्ष मस्के या मल्लांनीही कुस्ती मैदानात सहभाग नोंदविला.



या आयोजनामुळे पाथर्डीतील कुस्ती परंपरेला प्रोत्साहन मिळण्यासह स्थानिक मल्लांना आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळाली. नामवंत मल्लांच्या लढती पाहण्यासाठी आलेल्या कुस्तीप्रेमींनी प्रत्येक कुस्तीला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या कुस्ती मैदानाला येळेश्वर संस्थानचे महंत रामगिरी महाराज, वीर फाउंडेशनचे वडार समाजाचे राज्याध्यक्ष विजुभाऊ गोरे, नगरचे नगरसेवक नितीन शेलार, पाथर्डीचे नगराध्यक्ष अभय आव्हाड, सुभाष मामा घोडके, संतोष लांडगे, अनिल गोटे, मारुती विटेकर, संदीप कुसळकर, दादा शिंदे, बाळासाहेब तुजारे, मंगलताई कोकाटे, सागर कुसमुडे, नानासाहेब देशमुख, कैलास पवार, बाळासाहेब आवारे, बंडुभाऊ भांडकर, पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण पवार, अनिल धोत्रे, पिराजी पवार, हरीभाऊ पवार, दत्तू पवार, नवनाथ पवार, दीपक पवार, पिंटू माने, अनिल म्हस्के, राजेंद्र म्हस्के, सचिन म्हस्के, स्वप्नील म्हस्के, आशीर्वाद कचरे, भैय्या शेख मेजर, याकुब शेख, लहु मुखेकर, बाळासाहेब मुखेकर, काकासाहेब देशमुख आणि सुखदेव धोत्रे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

आयोजक तुकाराम पवार, भोरुशेठ म्हस्के आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. तसेच कुस्ती मैदानाच्या आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले. युवराज केचे आणि मदने सर यांनी कुस्तीचे खुमासदार, माहितीपूर्ण आणि उत्कृष्ट शैलीत समालोचन केले. त्यांच्या समालोचनामुळे मैदानातील उत्साहात आणखी भर पडली.

# SPOT NEWS

## चिकणीत संत भागवत बाबांच्या पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाला प्रारंभ!

**● संगमनेर । वीरभूमी –**

संगमनेर तालुक्यातील चिकणी येथील श्रद्धास्थान असलेल्या श्री संत भागवत बाबा यांच्या ४६ व्या पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याला सुरुवात झाली आहे. शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर ते शुक्रवार, दि. ३० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत म्हाळुंगी नदीच्या तीरावरील महालिंगेश्वर आश्रमात हा सोहळा पार पडणार आहे. श्री संत भागवत बाबा ग्रामविकास ट्रस्टच्या वतीने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. स्वानंदसुखनिवासी संत भागवत बाबा हे महान वैराग्यमूर्ती होते. त्यांनी संगमनेरसह परिसरातील विविध तालुक्यांमध्ये भागवत भक्तीचा मोठ्या प्रमाणावर प्रसार केला. वारीचे महत्त्व, नामस्मरणाची महती तसेच निर्व्यसनी जीवनाचे महत्त्व त्यांनी आपल्या आचरणातून समाजाला पटवून दिले. लोभ, मोह आणि मायेपासून दूर राहून भक्तिमार्गाचा अवलंब करावा, असा संदेश त्यांनी दिला. या सप्ताहादरम्यान महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार आणि प्रवचनकार ह.भ.प. मधुकर महाराज दराडे, ह.भ.प. अरुण महाराज शिर्के, ह.भ.प. रमेश महाराज कानवडे, ह.भ.प. पांडुरंग महाराज फरगडे, ह.भ.प. अमोल महाराज भोत, ह.भ.प. अनिल महाराज मंडलिक, ह.भ.प. अभिषेक महाराज डावरे, ह.भ.प. मनोहर महाराज घोडे, ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर), ह.भ.प. व्यंकटेश महाराज सोनवणे, ह.भ.प. रामायणाचार्य ज्ञानेश्वर महाराज रासकर, ह.भ.प. पांडुरंग महाराज घुले, ह.भ.प. श्रावण महाराज अहिरे, ह.भ.प. धर्माचारी निवृत्ती महाराज चव्हाण, ह.भ.प. द्वाराचार्य महामंडलेश्वर रामकृष्णदास महाराज लहवितकर आणि ह.भ.प. दत्ता महाराज भोर यांच्या कीर्तन–प्रवचनांचे आयोजन करण्यात आले आहे. या कीर्तन आणि प्रवचनांच्या माध्यमातून भाविकांना आध्यात्मिक मार्गदर्शनासह सामाजिक प्रबोधनाची मेजवानी मिळणार आहे. महाराष्ट्रातील ख्यातनाम वारकरी, गायनाचार्य, मृदंगवादक, विणेकरी आणि अनेक भाविक या सोहळ्यासाठी उपस्थित राहणार आहेत. दरवर्षीप्रमाणे यंदाही सप्ताहात काकडा आरती, नियमाचे भजन, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण आणि विविध आध्यात्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. भक्ती, परंपरा आणि समाजप्रबोधन यांचा संगम असलेल्या या सोहळ्यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. संगमनेर, अकोले, सिन्नर तालुक्यांसह महाराष्ट्रातील भाविकांनी या आध्यात्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री संत भागवत बाबा ग्रामविकास ट्रस्टचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सर्व सदस्य आणि चिकणी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

## ब्रिगेडिअर राजीव चावला यांच्या हस्ते डॉ. उद्धव शिंदे यांचा गौरव

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**

सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांचा दिव्य दृष्टी फौंडेशन आणि शोभा सर्वोदय फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गौरव करण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयातील पंडित जवाहरलाल नेहरू सभागृहात झालेल्या कार्यक्रमात ब्रिगेडिअर राजीव चावला यांच्या हस्ते त्यांना सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. डॉ. शिंदे हे स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या माध्यमातून रक्तदान, आरोग्यसेवा, शैक्षणिक मदत, पर्यावरण संवर्धन, महिला सक्षमीकरण तसेच गरजू, अनाथ आणि दिव्यांग व्यक्तींना मदत अशा विविध उपक्रमांत सक्रिय योगदान देत आहेत. समाजातील वंचित घटकांना आधार देण्याच्या त्यांच्या कार्याची दखल घेऊन हा सन्मान करण्यात आला. यावेळी धनश्री विखे पाटील, उद्योजक नरेंद्र फिरोदिया, वरिष्ठ डाक अधीक्षक विकास पालवे, पोलीस उपअधीक्षक शिरीष वमने, हरजितसिंघ वधवा आणि दिव्य दृष्टी फौंडेशनचे कृष्णा तवले आदी मान्यवर उपस्थित होते.

# घारगावात पाण्यासाठी शेतकऱ्यांचा रास्ता रोको

**धरणे भरली, शेतं तहानलेली! । आवर्तनाची तारीख जाहीर करण्याची मागणी, अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशारा**

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**



श्रीगोंदा तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीत फळबागा आणि उभी पिके वाचविण्यासाठी तातडीने पाण्याचे आवर्तन सोडावे, या मागणीसाठी शेतकरी नेते राजेंद्र म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली घारगाव येथे नगर–दौंड महामार्गावर सुमारे दोन तास रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. शेतकऱ्यांनी पाणीप्रश्नावरून लोकप्रतिनिधी आणि जलसंपदा विभागाच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त करत प्रशासनाचे लक्ष वेधले.

धरणे भरलेली असताना शेतकऱ्यांना पाणी का मिळत नाही? आवर्तनाचे आश्वासन दिले जात असताना तलावांतील पाणी उपशावरील बंदी कायम का? शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी उद्योगपतींना देण्याचा प्रयत्न तर होत नाही ना? असे सवाल राजेंद्र म्हस्के यांनी उपस्थित केले.

निवडणुकांपेक्षा शेतकऱ्यांच्या पाण्याचा प्रश्न महत्त्वाचा असल्याचे सांगत म्हस्के यांनी लोकप्रतिनिधींवर निशाणा साधला. दुष्काळाच्या संकटात शेतकरी असताना निवडणुका बिनविरोध करण्याच्या चर्चांना प्राधान्य दिले जात आहे. आमदार विक्रम पाचपुते यांनी आवर्तनाच्या तारखेबाबत स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणी त्यांनी केली.

खासदार निलेश लंके यांना निवडून दिल्यानंतर तालुक्याला काय मिळाले, असा सवाल करत जलसंपदा मंत्री विखे पाटील यांच्याकडून श्रीगोंदा तालुक्यावर अन्याय होत असल्याचा आरोप म्हस्के यांनी केला. तातडीने आवर्तन न सोडल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

माजी जिल्हा परिषद सदस्य हेमंत नलगे यांनी आवर्तनाची तारीख जाहीर होत नसल्याने आणि तलावांतील पाणी उपशावरील बंदी कायम असल्याने शेतकरी अडचणीत सापडल्याचे सांगितले. शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत राजेंद्र म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली लढा सुरू ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

आम आदमी पार्टीचे राजेंद्र नागवडे यांनी निवडणुकांसाठी बैठका घेतल्या जातात; मात्र शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर निर्णय घेण्यासाठी वेळ दिला जात नसल्याची टीका केली. पाण्याच्या मागण्यांवर ठोस निर्णय न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

यावेळी भास्कर वागस्कर, डॉ. अनिल कोकाटे, एकनाथ बारगुजे, अशोक नवले, बाळासाहेब नलगे, राजेंद्र इधाटे, बापुसाहेब निंभोरे, गोरख उंडे, नितीन डुबल, विश्वास थोरात, लक्ष्मण मचे, रघुनाथ खामकर, तुकाराम कळमकर, आप्पासाहेब शिंदे, सोपान शिंदे, सुभाष दरेकर, महादेव म्हस्के, राजेंद्र पोकळे यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. भूषण बडवे यांनी सूत्रसंचालन केले, तर शरद जगताप यांनी आभार मानले.

## तांत्रिक ग्रामपंचायत अधिकारी संघटनेची राज्यस्तरीय त्रैमासिक सभा आज छत्रपती संभाजीनगरात

**● पारनेर । वीरभूमी–**

महाराष्ट्र राज्य तांत्रिक ग्रामपंचायत अधिकारी संघटनेच्या वतीने राज्यस्तरीय त्रैमासिक सभा, सभासद संवाद मेळावा व चर्चासत्र रविवार, दि. २५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता मराठवाडा महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आले आहे. संघटनेचे संस्थापक राज्याध्यक्ष नितीन धामणे यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा होणार आहे.या सभेत संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेण्यासह ग्रामसभा बहिष्कार आंदोलनाची पुढील दिशा निश्चित करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. तसेच ग्रामपंचायत अधिकारी संवर्गाच्या विविध प्रश्नांवर विचारविनिमय करून आगामी काळातील संघटनात्मक धोरण ठरविण्यात येणार आहे.

सभेच्या प्रारंभी सुरवडी, ता. फलटण, जि. सातारा येथे झालेल्या मागील बैठकीच्या इतिवृत्तास मंजुरी देण्यात येणार आहे. त्यानंतर मागील त्रैमासिकातील संघटनेच्या कामकाजाचा, मंत्रालयीन स्तरावर करण्यात आलेल्या पत्रव्यवहाराचा आणि विविध मागण्यांसाठी केलेल्या पाठपुराव्याचा आढावा घेतला जाईल. ग्रामसभा बहिष्कार आंदोलनासंदर्भात चर्चा करून पुढील रचनात्मक भूमिका निश्चित केली जाणार आहे. विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी करताना ग्रामपंचायत अधिकाऱ्यांवर पडणारा अतिरिक्त कामाचा ताण, त्यातून निर्माण होणाऱ्या अडचणी, संवर्गाच्या प्रलंबित मागण्या आणि जिल्हास्तरावरील प्रश्न यांवरही सविस्तर चर्चा होणार आहे. याशिवाय संघटनेचे आर्थिक व्यवहार, सभासद वर्गणी, विभागीय व जिल्हास्तरीय कार्यकारिणींचे कामकाज आणि आवश्यकतेनुसार कार्यकारिणींच्या पुनर्रचनेबाबत निर्णय घेण्यावर विचार केला जाणार आहे.

या वेळी पदोन्नती प्राप्त सभासद, विशेष उल्लेखनीय कार्य करणारे कर्मचारी, नवनियुक्त पदाधिकारी आणि संघटनेत नव्याने सहभागी झालेल्या सभासदांचा सन्मान करण्यात येणार आहे. सभासदांना आपली मते, प्रश्न व सूचना मांडण्यासाठी संवाद मेळाव्यात संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे.

संघटनेची एकजूट मजबूत करणे, पदाधिकाऱ्यांमध्ये समन्वय वाढविणे आणि संवर्गाच्या न्याय्य मागण्यांसाठी प्रभावीपणे पाठपुरावा करणे, हा या सभेचा प्रमुख उद्देश आहे. राज्य, विभाग, जिल्हा व तालुकास्तरीय सर्व पदाधिकारी आणि सभासदांनी मोठ्या संख्येने व वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन राज्य कार्यकारिणीच्या वतीने राज्यसचिव हरिश्चंद्र काळे यांनी केले आहे.

# मढीत रेशन धान्याचा काळाबाजार?

**पाच किलोमागे एक किलो धान्य कमी देत असल्याचा ग्रामस्थांचा आरोप; पावती न देणे, मका-ज्वारीऐवजी पैसे घेण्याची सक्ती केल्याची तक्रार**

**● पाथर्डी । वीरभूमी–**

मढी (ता. पाथर्डी) येथील स्वस्त धान्य दुकानात रेशनधारकांना मंजूर कोट्यापेक्षा कमी धान्य दिले जात असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. धान्याच्या वजनात तफावत, वाटपानंतर पावती न देणे, मका व ज्वारीऐवजी प्रतिकिलो दहा रुपये देण्याची सक्ती, तसेच दुकानात आवश्यक नोंदी व माहिती उपलब्ध नसणे, अशा विविध तक्रारी ग्रामस्थांनी केल्या आहेत. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित दुकानदाराचा परवाना रद्द करावा आणि दोषी आढळणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनानुसार, रेशनचे धान्य घेण्यासाठी दुकानात गेलेल्या लाभार्थ्यांना वाटपातील कथित अनियमितता आढळून आली. धान्याचे वजन तपासले असता पाच किलोमागे एक किलो धान्य कमी मिळत असल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे. ऑनलाइन नोंदीनुसार ३५ किलो धान्य मिळणे अपेक्षित असलेल्या लाभार्थ्यांना केवळ २३ किलो, तर ५० किलो धान्य मंजूर असलेल्या लाभार्थ्यांना अवघे ३३ किलो धान्य दिले जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

शासनाकडून मंजूर होणारे धान्य लाभार्थ्यांना पूर्ण प्रमाणात मिळते की नाही, याची प्रशासनाने प्रत्यक्ष तपासणी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

रेशनचे धान्य घेतल्यानंतर लाभार्थ्यांना पावती दिली जात नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. तसेच दुकानात धान्यसाठ्याची माहिती, दरफलक आणि आवश्यक नोंदी उपलब्ध नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. कोणत्या लाभार्थ्याला किती धान्य मंजूर आहे आणि प्रत्यक्षात किती धान्य मिळणार आहे, याची स्पष्ट माहिती दिली जात नसल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

मका व ज्वारीचे वाटप करण्याऐवजी प्रतिकिलो दहा रुपये देण्याची सक्ती केली जात असल्याची तक्रारही ग्रामस्थांनी केली आहे. या सर्व बाबींची चौकशी करून लाभार्थ्यांना नियमानुसार धान्य मिळत असल्याची खातरजमा करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

संबंधित स्वस्त धान्य दुकान नियमितपणे सुरू राहत नसल्यामुळे गरीब व गरजू कुटुंबांना रेशनचे धान्य मिळविण्यासाठी वारंवार हेलपाटे मारावे लागत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. चुकीची माहिती देऊन गावातील अनेक रेशनकार्डे बंद करण्यात आल्याची तक्रारही निवेदनातून करण्यात आली आहे. धान्यवाटपाबाबत माहिती विचारणाऱ्या ग्रामस्थांशी दादागिरी केली जात असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

मढी येथील स्वस्त धान्य दुकानाची प्रत्यक्ष तपासणी करावी, उपलब्ध धान्यसाठा आणि वाटपाच्या नोंदींची पडताळणी करावी, लाभार्थ्यांना नियमानुसार धान्य मिळते की नाही, याची खातरजमा करावी आणि दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. प्रशासनाने सात दिवसांच्या आत या प्रकरणात चौकशी करून कारवाई न केल्यास तहसील कार्यालयासमोर उपोषणाला बसण्याचा इशाराही ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे दिला आहे. त्यामुळे प्रशासन या तक्रारीची कितपत गांभीर्याने दखल घेते आणि चौकशीतून काय निष्पन्न होते, याकडे मढी ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

या निवेदनावर राधाकिसन मरकड, फिरोज शेख, नवनाथ मरकड, साहेबराव मरकड, बाळू साळवे, सतीश राधाकिसन मरकड, किरण साळवे, भाग्येश मरकड, जावेद शेख, योगेश मरकड, शफिक मोमीन, जान मोहम्मद पटेल, गेनू पगारे, पोपट आरोळे, संदीप साळुंखे, भाऊसाहेब आरोळे, छबु आरोळे, रामचंद्र क्षीरसागर, प्रदीप पाखरे, रमेश कुटे आणि अजिज शेख यांच्यासह सुमारे चाळीस ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# लोकसहभागातून शाळांचा कायापालट; श्रीगोंदा तालुक्यातील २३ शाळांचा गौरव!

**लोणीव्यंकनाथ येथे अग्निपंख फाउंडेशनचा शिक्षक प्रेरणा सोहळा । 'बेस्ट स्कूल, बेस्ट लीडर' पुरस्कारांचे वितरण**

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**




गुणवत्तापूर्ण शिक्षणाला चालना देण्यासह लोकसहभागातून शाळांचा विकास साधणाऱ्या श्रीगोंदा तालुक्यातील १५ प्राथमिक शाळा आणि आठ विद्यालयांचा लोणीव्यंकनाथ येथे आयोजित शिक्षक प्रेरणा सोहळ्यात 'बेस्ट स्कूल, बेस्ट लीडर' पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. अग्निपंख फाउंडेशनच्या वतीने आयोजित या सोहळ्यात शिक्षण, वाचनसंस्कृती, विद्यार्थ्यांचे आत्मबळ आणि शाळांच्या विकासासाठी लोकसहभागाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, पुणे विभागाचे आयकर आयुक्त डॉ. नितीन वाघमोडे, दीपस्तंभ फाउंडेशनचे यजुर्वेद महाजन आणि उद्योजक प्रकाश कुतवळ यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

'शिक्षक राष्ट्रप्रगतीचे मानबिंदू' या विषयावर बोलताना यजुर्वेद महाजन म्हणाले की, शिक्षक हा समाजातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. शिक्षकांनी कर्तव्यनिष्ठेने काम केल्यास राष्ट्राच्या प्रगतीला निश्चितच गती मिळेल.

'वाचन संस्कृतीचे जतन करू या' या विषयावर मार्गदर्शन करताना आनंद भंडारी यांनी विद्यार्थ्यांमधील वाचनाचे प्रमाण कमी होत असल्याबद्दल खंत व्यक्त केली. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करण्यासाठी शिक्षकांनी मनापासून प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. नितीन वाघमोडे यांनी 'शालाबाह्य ज्ञान आणि विद्यार्थ्यांचे आत्मबळ' या विषयावर विचार मांडले. विद्यार्थ्यांना विविध पुस्तके उपलब्ध करून देण्याबरोबरच खेळाच्या तासात शिक्षकांनी स्वतः विद्यार्थ्यांसोबत सहभागी व्हावे, असे त्यांनी सांगितले.

आयर्नमॅन राजाराम शिंदे यांनी 'खेळ, व्यायाम आणि संस्कार', लहू बोराटे यांनी 'लोकसहभागातून शाळांचा विकास', तर जिल्हा शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी 'शिष्यवृत्तीची तयारी आणि विद्यार्थ्यांसाठी सुविधा' या विषयांवर मार्गदर्शन केले.

### यांना मिळाले पुरस्कार

- **'बेस्ट लीडर' पुरस्कारार्थी :** यजुर्वेद महाजन (दिव्यांग शिक्षण), डॉ. नितीन वाघमोडे (पाणी), लहू बोराटे (गुरुजी) आणि श्रद्धा लोंढे (विद्यार्थी) यांना 'बेस्ट लीडर' पुरस्काराने गौरविण्यात आले.
- **'बेस्ट स्कूल' पुरस्कारप्राप्त प्राथमिक शाळा :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा श्रीगोंदा मुले, घोडेगाव, गोसावीवाडी, कापसे वस्ती (श्रीगोंदा), काष्टी, सावित्रीबाईनगर (शेडगाव), रायकर वस्ती (हंगेवाडी), उंडेमळा (मढेवडगाव), बाबुर्डी, म्हसे, कोळगाव, बेलवंडी कोठार, खोमणेमळा (घारगाव) आणि दाणेवाडी.
- **पुरस्कारप्राप्त विद्यालये :**तांदळेश्वर विद्यालय, तांदळी; श्रीमंत विजयाराजे शिंदे कन्या विद्यालय, श्रीगोंदा; भानेश्वर विद्यालय, भानगाव; यशवंतराव चव्हाण विद्यालय, घारगाव; न्यू इंग्लिश स्कूल, मढेवडगाव; खंडेश्वर विद्यालय, येळपणे; खंडेश्वर विद्यालय, उख्खलगाव आणि कौठा विद्या मंदिर, कौठा.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अग्निपंख फाउंडेशनचे विश्वस्त अनिल शिंदे यांनी केले. यावेळी जिल्हा शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, गटविकास अधिकारी राणी फराटे, गटशिक्षणाधिकारी कुसुमकुमारी कानडी, विजय त्रिंबके, मधुकर राहणे, दत्तात्रय गावडे, उपाध्यक्ष प्रा. संजय लाकुडझोडे, शिवदास शिंदे, प्रमिला इथापे, किसन वऱ्हाडे, अंकुश घाडगे, डॉ. संतोष ओव्हळ, माऊली कुरुदळे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन सुजाता डाके आणि विजया शेलार यांनी केले.

# गोदावरी कालव्याला रब्बीत ३०, उन्हाळ्यात ४८ दिवस पाणी!

## दारणा प्रकल्पाच्या आवर्तन नियोजनाला कालवा सल्लागार समितीची मान्यता । पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे जलसंपदामंत्री विखे पाटील यांचे आवाहन

**कोपरगाव । वीरभूमी –** दारणा प्रकल्पावरील गोदावरी कालव्याच्या सन २०२६–२७ या वर्षातील रब्बी आणि उन्हाळी हंगामासाठी पाणीवाटपाचे नियोजन निश्चित करण्यात आले आहे. रब्बी हंगामात ३० दिवस, तर उन्हाळी हंगामात तीन टप्प्यांत एकूण ४८ दिवस पाण्याचे आवर्तन देण्याच्या प्रस्तावाला कालवा सल्लागार समितीने मान्यता दिली. धरणे पूर्ण क्षमतेने भरलेली असली, तरी लाभक्षेत्रातील नागरिकांच्या आणि शेतीच्या गरजा लक्षात घेऊन उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्वांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

दारणा प्रकल्पावरील गोदावरी कालव्याच्या रब्बी व उन्हाळी हंगामातील पाणीवापराचे नियोजन आणि संभाव्य आवर्तनांबाबत कालवा सल्लागार समितीची बैठक राहाता येथील कुंदन लॉन्स येथे जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत आगामी हंगामातील संभाव्य आवर्तनांचे वेळापत्रक सादर करण्यात आले.

बैठकीस आमदार आशुतोष काळे, आमदार हेमंत ओगले, माजी आमदार स्नेहलता कोल्हे, अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, अधीक्षक अभियंता राजेश गोवर्धने, तहसीलदार अमोल मोरे यांच्यासह जलसंपदा विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि लाभक्षेत्रातील शेतकरी उपस्थित होते.

अधीक्षक अभियंता राजेश गोवर्धने यांनी बैठकीत आवर्तनाच्या संभाव्य नियोजनाची सविस्तर माहिती दिली. त्यानुसार रब्बी हंगामात १ डिसेंबर २०२६ ते ३० डिसेंबर २०२६ या कालावधीत ३० दिवसांचे आवर्तन प्रस्तावित आहे. या कालावधीत २.६२० टीएमसी पाणी वापराचे नियोजन करण्यात आले असून, हे पाणी सिंचन आणि बिगर सिंचनासाठी उपलब्ध असेल.

उन्हाळी हंगामासाठी एकूण ४८ दिवसांचे आवर्तन तीन टप्प्यांत देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या हंगामासाठी एकूण ५.१८८ टीएमसी पाणी वापर प्रस्तावित आहे.

**पहिला टप्पा :** १ मार्च २०२७ ते २२ मार्च २०२७ (२२ दिवस). या कालावधीत २.४३ टीएमसी पाण्याचे नियोजन असून, मर्यादित सिंचन आणि बिगर सिंचनासाठी पाणी उपलब्ध असेल.

**दुसरा टप्पा :** ५ मे २०२७ ते १७ मे २०२७ (१३ दिवस). या कालावधीत १.४३ टीएमसी पाण्याचे नियोजन असून, हे पाणी बिगर सिंचनासाठी असेल.

**तिसरा टप्पा :** १० जुलै २०२७ ते २२ जुलै २०२७ (१३ दिवस). या कालावधीत १.३२८ टीएमसी पाणी वापराचे नियोजन करण्यात आले आहे.

या प्रस्तावित पाणीवाटप नियोजनास जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या



कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

शेतकऱ्यांना विविध कामांसाठी शासकीय कार्यालयांत वारंवार चकरा माराव्या लागू नयेत, यासाठी जलसंपदा विभागाचे कामकाज गतिमान करण्याबरोबरच ऑनलाइन सेवा अधिक सुलभ करण्यावर भर द्यावा, असे निर्देश पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

शेतकऱ्यांना त्यांच्या अर्जांची आणि कामांची सद्यस्थिती थेट मोबाईलवर उपलब्ध व्हावी, तसेच विविध डिजिटल सेवांचा लाभ सहजपणे घेता यावा, यासाठी प्रशासकीय पातळीवर कार्यवाही सुरू असल्याची माहितीही त्यांनी उपस्थित शेतकऱ्यांना दिली.

शेती आणि बिगर सिंचनाच्या गरजा लक्षात घेऊन उपलब्ध पाण्याचा योग्य वापर करणे, पाणीवाटपाचे नियोजन प्रभावीपणे राबविणे आणि शेतकऱ्यांना प्रशासकीय सेवा सुलभतेने उपलब्ध करून देणे, यावर या बैठकीत भर देण्यात आला.

# गोदावरी कालवा लाभधारक शेतकऱ्यांना चार आवर्तने द्या!

## स्नेहलताताई कोल्हे यांची आग्रही मागणी । रब्बीचे पहिले आवर्तन नोव्हेंबरच्या पहिल्या पंधरवड्यात सुरू करा

**कोपरगाव । वीरभूमी–** गोदावरी डावा व उजवा कालवा लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना रब्बी हंगामाचे पहिले आवर्तन नोव्हेंबरच्या पहिल्या पंधरवड्यात सुरू करावे. तसेच रब्बी आणि उन्हाळी हंगामात सर्व पिकांना सरसकट पाणी देऊन प्रत्येकी दोन, अशी एकूण चार आवर्तने द्यावीत, अशी आग्रही मागणी माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे यांनी जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली.



राहाता येथील कुंदन लॉन्स येथे शनिवार, दि. २४ ऑक्टोबर रोजी जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली नाशिक पाटबंधारे विभागाच्या गोदावरी कालवा सल्लागार समितीची बैठक पार पडली. या बैठकीत स्नेहलताताई कोल्हे यांनी गोदावरी डावा व उजवा कालवा लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या सिंचनासंदर्भातील विविध प्रश्न मांडून त्यावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

बैठकीस आमदार आशुतोष काळे, आमदार हेमंत ओगले, करण ससाने, प्रभारी तथा अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे, राजेश परजणे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर परजणे, अरुणदादा येवले, शिवाजीतात्या लहारे, बाळासाहेब वक्ते, नारायणराव कार्ले, बापूसाहेब बाराहाते, भगवान टिळेकर, आलेश कापसे, अनिल गाढवे, अनिल बोठे, सुनील देवकर, उत्तमराव चरमळ, अधीक्षक अभियंता, कोपरगाव व राहाता येथील उपअभियंते, पाटबंधारे विभागाचे अधिकारी–कर्मचारी आणि शेतकरी उपस्थित होते.

स्नेहलताताई कोल्हे म्हणाल्या की, रब्बी हंगामाचे पहिले आवर्तन नोव्हेंबरच्या पहिल्या पंधरवड्यात सुरू करणे आवश्यक आहे. रब्बी हंगामासाठी पाणीवापराचे निकष स्पष्ट करावेत, जेणेकरून शेतकऱ्यांना सिंचनाचे नियोजन करता येईल. रब्बी आणि उन्हाळी हंगामात सर्व पिकांना सरसकट पाणी देऊन प्रत्येकी दोन आवर्तने उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणीही त्यांनी केली.

कालव्यांमधील ७० टक्क्यांपेक्षा अधिक असलेला वहनव्यय कमी करण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात. पाण्याची गळती व अपव्यय रोखून उपलब्ध पाण्याची बचत करावी आणि त्यातून शेतकऱ्यांना अतिरिक्त आवर्तन उपलब्ध करून द्यावे, असे कोल्हे यांनी सांगितले. तसेच नमुना क्रमांक सातद्वारे पाणीमागणी करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना २.५ किलोमीटरची अट न लावता सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी आग्रही मागणी त्यांनी केली.

खरीप हंगामातील पिकांच्या नुकसानीमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. अशा परिस्थितीत रब्बी हंगामातील पाणीमागणी अर्जावरील पाणीपट्टीत सवलत द्यावी, अशी मागणी स्नेहलताताई कोल्हे यांनी केली.

शेतकऱ्यांकडे थकीत असलेल्या पाणीपट्टीच्या वसुलीबाबतही सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांना दिलासा द्यावा. सिंचनासाठी वेळेवर पाणी उपलब्ध होणे, पाणीवाटपाचे स्पष्ट निकष निश्चित करणे आणि आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना सवलती देणे आवश्यक असल्याचे त्यांनी बैठकीत मांडले.

गोदावरी कालवा लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना पुरेसे पाणी मिळावे, सिंचनाचे नियोजन वेळेत व्हावे आणि पाणीवापरातील त्रुटी दूर करून अतिरिक्त आवर्तन उपलब्ध व्हावे, यासाठी जलसंपदा विभागाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावेत, अशी भूमिका स्नेहलताताई कोल्हे यांनी मांडली.

# शेकटे फाट्यावर मायलेकाला लुटले!

## चौघांनी अडवून सोन्याचे दागिने, रोख रक्कम व दुचाकी हिसकावली

**पाथर्डी । वीरभूमी–** पाथर्डी–कोरडगाव रस्त्यावरील शेकटे फाट्याजवळ दुचाकीवरून जाणाऱ्या मायलेकाला अडवून चौघांनी लुटल्याची घटना २२ ऑक्टोबर रोजी रात्री साडेआठच्या सुमारास घडली. आरोपींनी महिलेच्या गळ्यातील व कानातील सोन्याचे दागिने, रोख रक्कम आणि दुचाकी असा एकूण ६९ हजार रुपयांचा ऐवज जबरदस्तीने हिसकावून नेल्याची फिर्याद पाथर्डी पोलिसांत दाखल करण्यात आली आहे. याप्रकरणी दीपक योसेफ गरुड (वय २३, रा. तिसगाव, ता. पाथर्डी) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार, दीपक गरुड हे आई मैना गरुड यांच्यासोबत दुचाकीवरून तिसगावकडे जात होते. २२ ऑक्टोबर रोजी रात्री साडेआठच्या सुमारास ते पाथर्डी–कोरडगाव रस्त्यावरील शेकटे फाट्याजवळ आले असता, पाठीमागून पल्सर दुचाकीवरून आलेल्या दोघांनी त्यांची दुचाकी आडवी लावून त्यांना अडवले. त्याचवेळी आणखी एका दुचाकीवरून दोघे जण तेथे आले.

फिर्यादीच्या म्हणण्यानुसार, चार जणांपैकी एका आरोपीने त्यांच्या आईच्या गळ्यातील आणि कानातील सोन्याचे दागिने तसेच रोख रक्कम जबरदस्तीने काढून घेतली. अन्य आरोपींनी दीपक गरुड यांना धरून ठेवत मारहाण केली आणि त्यांच्या खिशातील दोन हजार रुपये काढून घेतले. त्यानंतर आरोपी दुचाकीसह घटनास्थळावरून पसार झाले.

घटनेनंतर दीपक गरुड यांनी डायल ११२ वर संपर्क साधून पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर पाथर्डी पोलिसांनी फिर्यादीकडून घटनेची माहिती घेतली. फिर्यादीने दोन आरोपींना ओळखल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

फिर्यादीने दिलेल्या माहितीनुसार, रिलस्टार कोमल काळे आणि सुधीर चौधर यांच्यासह अन्य दोन अनोळखी व्यक्तींविरोधात पाथर्डी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. चोरीस गेलेल्या ऐवजात सात हजार रुपये रोख, फिर्यादीच्या खिशातील दोन हजार रुपये, सोन्याचे दागिने आणि दुचाकीचा समावेश असल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या घटनेमुळे पाथर्डी–कोरडगाव रस्त्यावरील रात्रीच्या प्रवासाच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पाथर्डी पोलीस करीत आहेत.

# दुष्काळी परिस्थितीचा विचार करुन जास्तीत जास्त आवर्तन पूर्ण क्षमतेने द्या

## आमदार आशुतोष काळेंची कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत मागणी

**कोपरगाव । वीरभूमी–** कोपरगाव मतदारसंघात पाऊस अतिशय कमी झाला असून खरीप हंगामात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. परंतु धरण क्षेत्रात समाधानकारक पाऊस झाल्याने परिसरात ओव्हरफ्लोचे पाणी फिरले असल्याने आजपर्यंत पाणी टिकून असले तरी पुढील परिस्थिती अतिशय गंभीर राहणार आहे. सुदैवाने सर्व धरणे पूर्ण क्षमतेने भरलेली आहेत हि काहीसा दिलासा देणारी बाब आहे. यापूर्वी धरणे भरलेली असतांना रब्बी दोन आणि उन्हाळी हंगामात दोन आवर्तन देण्यात आले आहेत. परंतु यावर्षी पाऊस कमी झाला याची सर्वांना जाणीव आहे. त्यामुळे दिली जाणारी आवर्तन पूर्ण क्षमतेने द्यावीत व उन्हाळ्यात दोन आवर्तन द्यावेत तरच फळबागा आणि ऊस वाचणार असून शेतकऱ्यांना चारा पिके करता येणार आहेत. तुम्ही जलसंपदा मंत्री असल्यामुळे आम्हाला काळजी नाही कारण तुम्हाला सर्व परिस्थितीची जाणीव आहे. त्यामुळे दुष्काळी परिस्थितीचा गांभिर्याने विचार करून जास्तीत जास्त आवर्तन पूर्ण क्षमतेने द्यावेत अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत राज्याचे जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पा.यांच्याकडे केली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहाता येथे जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कालवा सल्लागार समितीची बैठक शनिवार (दि.२४) रोजी पार पडली. या बैठकीत आ.आशुतोष काळे बोलत होते. ते म्हणाले की, गोदावरी उजव्या कालव्याचे आवर्तन सोडण्यापूर्वी चाऱ्यांची कामे पूर्ण करावी, उजव्या कालव्याच्या टेलच्या चाऱ्यांची कामे झाली असून वरच्या भागातील चाऱ्यांच्या कामासाठी निधी उपलब्ध करून द्यावा.तसेच डाव्या कालव्यासह चाऱ्यांच्या नूतनीकरणासाठी प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरु असून त्यासाठी निधी द्यावा. गोदावरी उजव्या आणि डाव्या कालव्यांवरील काही पुलांसाठी निधी उपलब्ध झाला असून ते काम जवळपास वर्षभरापासून थांबलेले आहे. ते काम



लवकरात लवकर सुरु करण्याच्या सूचना द्याव्यात. आवर्तन कालावधीत मिळणाऱ्या मोठ्या कालावधीत प्रस्तावित कामांना मंजुरी मिळाल्यास ती कामे पूर्ण करता येणार आहे त्यासाठी प्रस्तावित कामांना मंजुरी द्यावी. महायुती शासनाने शेतकऱ्यांची कर्ज माफी केली असून साडेसात एचपी पर्यंतच्या शेती पंपाचे वीज बिल माफ केले. तसेच शेतकऱ्यांची पाणी पट्टी पूर्णपणे माफ करावी व खरिपाच्या आवर्तनाची देखील पाणी पट्टी माफ करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. तसेच कोपरगाव नगरपालिकेची थकीत पाणी पट्टी माफ करावी अशी मागणी केली असता, जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी फक्त चालू वर्षाची पाणी पट्टी भरावी थकीत पाणी पट्टीबाबत नंतर निर्णय घेणार असल्याचे सांगितले.

याप्रसंगी आ.हेमंत ओगले, मा. आ. सौ. स्नेहलता कोल्हे, श्रीरामपूरचे नगराध्यक्ष करण ससाणे, गोदावरी दुध संघाचे चेअरमन राजेश परजणे, नाशिक लाभक्षेत्र विकास प्राधिकरणचे अधीक्षक अभियंता राजेश गोवर्धने, उपजिल्हाधिकारी शैलेश हिंगे, प्रांताधिकारी माणिकराव आहेर, गोदावरी पाटबंधारे कोपरगाव उपविभागाचे अभियंता संदिप पाटील, राहाता उपविभाग अभियंता विवेक लव्हाट, शिर्डीच्या नगराध्यक्षा सौ. जयश्री थोरात, उपनगराध्यक्ष अभय शेळके, बाबासाहेब कोते, राजेंद्र खिल्लारी आदींसह पाटबंधारे विभागाचे अधिकारी, शेतकरी आदी उपस्थित होते.

### आमचे पाणी मिळणार नाही

■ कुठेच पाऊस पडतांना दिसत नव्हता त्यामुळे पुढील भीषण दुष्काळाच्या परिस्थितीची जाणीव अगोदरच झाल्यामुळे परिस्थितीचे गांभीर्य ओळखून आम्ही वेळीच पाणी अडवायला सुरुवात केल्यामुळे आज आमच्या केटीवेअरमध्ये थोडे फार पाणी दिसत असले तरी ते पुरेसे नाही ते पाणी अगोदरच कमी आहे. त्यामुळे आम्ही आमच्या बंधाऱ्यातील पाणी खाली जावू देणार नाही.आम्ही कुणाचे पाणी घेतलेले नाही. खालचे बंधारे का भरले नाही? याचा जाब तुम्ही पाटबंधारे खात्याच्या अधिकाऱ्यांना विचारा.पण तुम्हाला आमचं पाणी मिळणार नाही असे आमदार आशुतोष काळे यांनी ठणकावून सांगितले.